भाग एक

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



## संपादक


लुदमिला शेकाचेव्हा | श्री. राजेंद्र फाळके | डॉ. स्नेहल तावरे

डॉ. विठ्ठल शिवणकर | डॉ. शिवलिंग मेनकुदळे | डॉ. संजय नगरकर

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे
# ‘देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान’

## भाग १

संपादक

• लुदमिला शेकाचेव्हा • श्री. राजेंद्र फाळके • डॉ. स्नेहल तावरे
• डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर

स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system, or transmitted in any form or be any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthoirzed act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.


ॐ स्नेहवर्धन प्रकाशन : क्र. १३९६

ॐ 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान' (समीक्षा - संदर्भ)

ॐ **प्रकाशक आणि मुद्रक :**
डॉ. स्नेहल तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे - ४११ ०३०.
स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३६९६१
भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
ई-मेल : snehaltawre@gmail.com


ॐ © **S R I**


ॐ **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

ॐ **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

ॐ **अक्षरजुळणी :** एस. एस. ग्राफिक्स, पुणे

ॐ **ISBN 978 - 93 - 91033 - 31 - 6**

ॐ **पृष्ठसंख्या :** १८८

ॐ **मूल्य : ₹** ३००/-
$ 8

# अनुक्रमणिका


● पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... संपादक /११

१) माझे वडील - अण्णा डॉ. लीला गोविलकर /१३

२) माझे स्फूर्तिदायी वडील : डॉ. पंजाबराव जाधव डॉ. स्नेहल तावरे /१७

३) डॉ. र.बा. मंचरकर : सारस्वताचे ज्ञानर्षी डॉ. बाबुराव उपाध्ये /२१

४) प्रतिभावंत लेखक : जी. ए. कुलकर्णी डॉ. वर्षा फाटक /२५

५) समतेच्या वैचारिक चळवळीचे पहिले क्रांतिकारक महात्मा बसवेश्वर डॉ. अर्चनादेवी मोरे /२९

६) मॉरिशसमधील तेजस्वी पुरुष : सर अनिरुद्ध जगन्नाथ डॉ. मधुमती कौंजुल (मॉरिशस) /३३

७) उत्साहाचा झरा : प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव डॉ. वैजयंतीमाला जाधव /३७

८) सहकाराचे महामेरू : पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील डॉ. कुंदा कवडे /४०

९) माझे वडील : ग्रामीण - शहरी मधील दुवा डॉ. लतिका जाधव /४४

१०) ॲड. रावसाहेब शिंदे यांचे मूल्याधिष्ठित वैचारिक वाङ्मय डॉ. शिवाजी काळे /४७

११) महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य डॉ. अरुणा वाघोले /५१

१२) लोककल्याणकारी राजा सयाजीराव गायकवाड डॉ. पौर्णिमा कोल्हे /५५

१३) बहुजनांच्या शिक्षणाचे आधारस्तंभ - उत्तमराव पाटील डॉ. दीपक गायकवाड /५९

१४) स्वामी विवेकानंदांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान आणि दृष्टिकोन डॉ. कविता मते /६३

१५) पाडोळीचा लामणदिवा - राम स्वाती पाटणकर /६७

१६) कार्यक्षम उत्कृष्ट रयत सेवक - डॉ. संजय क्षीरसागर डॉ. जयवंत अवघडे /७०

१७) दादा वैद्य यांचे कार्य व कर्तृत्व डॉ. गीता येर्लेकर /७४

१८) डॉ. सतीश बडवे : व्यक्तिमत्त्व आणि लेखन कर्तृत्व डॉ. न. ब. कदम /७८

१९) माझे वडील - गीत गजाननकार रा. श्री. नेरेकर डॉ. अपर्णा साबणे /८२

# उत्साहाचा झरा : प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव

**डॉ. वैजयंतीमाला जाधव**

संवेदनशील कवी, नामांकित महाविद्यालयात प्राचार्य, वनस्पतीशास्त्रज्ञ, संशोधक,लेखक अशा अनेक बिरुदावलीने ज्यांना ओळखता येईल ते म्हणजे डॉ. राजेंद्र झुंजारराव. त्यांची कवी म्हणून असलेली ओळख त्यांचे चारही कवितासंग्रह वाचल्यावर ठळक होते. 'फुलोरा, ओंजळ, गुंफण, बहर' आणि बेवू घातलेले 'झुळूक आणि स्पंदन' हे कवितासंग्रह कवी म्हणून त्यांची ओळख प्रस्थापित करतात. त्यांनी महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थीदशेपासून काव्यलेखनाला सुरुवात केली होती. महाविद्यालयात असताना मॉडर्न महाविद्यालयाच्या व 'मॉम' या भित्तीपत्रकामधूनही, नियतकालिकातून काव्यलेखन केले आहे. १९८३ साली मासिकात 'अभिज्ञान' ही कविता प्रसिद्ध. २०१० पासून आतापर्यन्त सुमारे १८०० कवितांचे लेखन पूर्ण झाले आहे. यापैकी निवडक ९३ कवितांचा संग्रह 'फुलोरा' या नावाने साहित्यविश्व प्रकाशन, पुणे यांच्यामार्फत ऑक्टोबर २०२१ मध्ये प्रसिद्ध झाला आहे. या पहिल्याच काव्यसंग्रहाला मंगळवेढा येथून दिला जाणारा शब्दकळा साहित्य संस्थेचा 'साहित्यरत्न' पुरस्कार प्राप्त झाला. मराठी साहित्य मंडळ, ठाणे येथून दिला जाणारा सावित्रीबाई फुले साहित्य भूषण पुरस्कार 'फुलोरा' या काव्यसंग्रहाला प्राप्त. 'ओंजळ' या काव्यसंग्रहाला स्वदेशी भारत सन्मान पुरस्कार प्राप्त. आतापर्यन्त स्वातंत्र्य चळवळीतील आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ज्या थोर विभूती होवून गेल्या त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा आलेख सांगणाऱ्या चरित्रपर कविता लिहिल्या आहे. त्यातील महात्मा गांधी यांच्यावरील कवितेला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. एकूण ८०० कवितांपैकी त्यातील काही निवडक कविता वेगवेगळ्या ठिकाणी प्रकाशित झाल्या आहेत. 'आई' या स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे येथील संस्थेने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाच्या मलपृष्ठावर त्यांनी लिहिलेली 'आई' कविता प्रकाशित झाली आहे. रोहिणी प्रकाशनाकडून प्रसिद्ध झालेल्या संपादित कवितासंग्रहात सुद्धा 'आई'ही आणखी एक वेगळी कविता तिच्या काव्य विशेषांमुळे घेण्यात आली.

आतापर्यंत १८०० कवितांच्या माध्यमातून वेगवेगळे काव्यप्रकार त्यांनी हाताळले आहेत. बालकविता, निसर्ग कविता, चरित्रपर कविता, कोळीगीते, गझल इ. प्रकारचे त्यांचे लेखन केले आहे. 'वाचे बरवे कवित्व' या कविता संग्रहातून त्यांच्या पाच कविता प्रकाशित झाल्या आहेत. काव्यलेखनाची आवड जपत अनेक काव्य प्रशिक्षण कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला आहे.

नवीन राष्ट्रीय धोरण २०२० मध्ये विविध प्रकारच्या कलांना प्रोत्साहित करण्याची भूमिका दिसून येते. त्याअनुषंगाने महाविद्यालयात विविध प्रकारचे उपक्रम राबवण्यासाठी 'प्राचार्य' या भूमिकेतून त्यांनी पुढाकार घेतला आहे. तबला, संवादिनी, नृत्य, काव्य लेखन आणि अभिनय कौशल्य अशा विविध प्रकारच्या कला प्रकारांना प्रोत्साहन देण्यासाठी पदवी पातळीवर संगीतशास्त्र अभ्यासक्रमाचे नियोजन त्यांनी केले आहे. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात काव्य प्रदर्शनात कवितांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी आवश्यक असे व त्यांना नोकरी व्यवसायाच्या संधीची माहिती देणारे अनेक लेखांचे लेखन केले आहे. त्यांचा दुसरा काव्यसंग्रह 'ओंजळ' प्रकाशित झाला आहे. 'ओंजळ' या संग्रहात ९४ निवडक कवितांचा समावेश केला आहे. 'गुंफण' हा त्यांचा तिसरा संग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. यात निवडक ६५ कवितांचा समावेश केला आहे. यानंतर त्यांचा 'बहर' हा कवितासंग्रह अभिरुची प्रकाशनाने प्रसिद्ध केला. तर 'स्पंदन' आणि 'झुळूक' हे काव्यसंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. या संपूर्ण कवितांमधून कवीची संवेदनशील, मर्मग्राही दृष्टी प्रत्ययाला येते. सभोवतालाबद्दल, निसर्गाबद्दल एक कवी म्हणून आपण किती जागरूक हवे याचे उदाहरण म्हणजे या कविता.निसर्ग हाच त्यांचा सखा आहे. पाने, फुले, पक्षी त्यांच्याशी संवादी असल्याचे या कवितांमधून अनुभवायला मिळते. माणसाचे जगणे, त्यातील तानेबाने, त्याला करावा लागणारा संघर्ष यात पराकोटीची सकारात्मकता त्यांना जाणवते. निसर्गातील छोटे छोटे पक्षी सुद्धा त्यांच्या कवितेचे विषय झाले आहेत. सौंदर्यवादी कवितांशी त्यांची कविता नाळ जोडताना दिसते.

कधी अवखळ बालकाच्या भूमिकेत, कधी पित्याच्या भूमिकेत, कधी एखाद्या सासुरवाशीणीच्या भूमिकेत यातील नायक आपल्याला भेटतो. सभोवतालच्या परिस्थितीचे आपण देणे लागतो अशी बांधीलकीची भावना या कवितेत त्यांनी जोपासलेली आहे.

मॉडर्न महाविद्यालयात २००४ पासून प्राचार्यपदाची धुरा डॉ. राजेंद्र झुंजारराव सर सांभाळत आहेत. प्रशासकीय काम करत असताना दिवसभर अनेक विद्यार्थ्यांना, पालकांना, त्यांच्या अडीअडचणीला त्यांना सामोरे जावे लागते. प्राचार्य कक्षात जाताना जे चिंतेचे, त्रासलेले भाव त्या विद्यार्थ्यांच्या किंवा पालकांच्या चेहऱ्यावर असतात ते बाहेर पडताना कधीच दिसत नाहीत. आत जाणारा प्रत्येक विद्यार्थी त्याच्या प्रश्नाचे उत्तर घेवून बाहेर आलेला दिसतो. कोणतीही अडचण, समस्या अतिशय शांत पद्धतीने सोडवण्याची कला सरांकडे आहे. संवेदनशील कवी आणि प्रशासकीय कौशल्य यांची सांगड त्यांच्या ठिकाणी खूपदा पाहायला मिळते. कोविडकाळात अनेकांनी त्यांच्या नोकऱ्या गमावल्या, अनेक विद्यार्थ्यांना जेवण, राहण्याची अडचण आली पण सरांनी कोणालाही कळू न देता अनेकांना मदत केली. अत्यंत सहिष्णुवृत्ती, सतत अभ्यासपूर्ण



वाचन आणि अफाट संयम ही सरांच्या व्यक्तिमत्त्वाची काही वैशिष्ट्ये सांगता येतील. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर प्राचार्य कॅटेगरीत ते बिनविरोध निवडून आले. 'उत्साहाचा झरा' किंवा 'हॅपी मॅन', असे त्यांना अत्यंत आदराने संबोधले जाते.

एक उत्कृष्ट प्रशासक, दूरदृष्टी असलेले, विद्यार्थी कल्याणासाठी झटणारे शिक्षक, कविमनाचे प्राचार्य ही त्यांची ओळख सर्वमान्य आहे.

❀❀